**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/एआरडब्ल्यु/२०२०-२१/ 23745-48

दि. १९-१२-२०२०.

# परिपत्रक

**वाचा : १) विद्यापीठ अध्यादेश-९९३.**
**२) शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९.**
**३) विद्यापीठ अनुदान आयोग अधिसुचना दि. १८ जूलै, २०१८.**
**४) शासनाचे परिपत्रक दि. ०८ जूलै, २०१९.**

या परिपत्रकाद्वारे मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक, अध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण निर्देशक तसेच ज्या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे त्या महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक यांना सुचित करण्यात येते की, शासनाने निर्गमित केलेले परिपत्रक दि. ०८ जूलै, २०१९ अन्वये विहित केल्यानुसार CAS योजनेअंतर्गत स्थान-११, स्थान-१२, स्थान-१३A व स्थान-१४ या साठी अनुक्रमे सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदासाठी पात्र असलेल्या अध्यापकांना नियमामध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार पदोन्नती देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी स्थान निहाय प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे अवलोकन करुन खालील कोष्टकात विनिर्धिष्ठित करण्यात आल्यानुसार दिनांक व जिल्हानिहाय शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हाचे नाव | पदोन्नतीस पात्र असलेल्या एकुण अध्यापकांची संख्या | शिबिर आयोजित करावयाच्या महाविद्यालयाचे ठिकाण / नाव | शिबिर आयोजित करावयाचा दिनांक | शिबिर आयोजित करणाऱ्या महाविद्यालयातील प्राचार्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उस्मानाबाद | ६४ | उपकेंद्र, उस्मानाबाद | दि. २९-१२-२०२० | डॉ. डी. के. गायकवाड, संचालक, उपकेंद्र उस्मानाबाद<br>मोब न. ८६६८५०७६८० | प्रस्तावित प्रस्तावासह शिबिराच्या ठिकाणी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीने एखाद्या अध्यापकाने ऐनवेळेवर शिबिर आयोजित करणाऱ्या प्राचार्य/ संचालकाकडे प्रस्ताव सादर केल्यास सदरील अध्यापकाची सुध्दा मुलाखत घेवून त्यांचे प्रकरण विहित प्रक्रियेने निकाली काढण्यात यावे. |
| २. | बीड | ६९ | सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड | दि. २९-१२-२०२० | डॉ. श्रीमती. दिपाली क्षीरसागर<br>मोब नं. ९८२२०४४५१९ | |
| ३. | जालना | ५५ | जे. ई. एस. महाविद्यालय, जालना | दि. ३०-१२-२०२० | डॉ. एस. बी. बजाज,<br>मोब नं. ९४२३४५७२२९ | |
| ४. | औरंगाबाद | १०४ | बजाज इंक्युबेशन सेंटर / सिफार्ट इमारत, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद | दि. ३०-१२-२०२० | डॉ. सचिन देशमुख, संचालक, बजाज इंक्युबेशन सेंटर<br>मोब नं. ९४२३१५०७८२ | |

प्रस्तुत प्रकरणी निर्धारित केलेल्या दिनांकास शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून शिबिराची सुरवात सकाळी १० : ३० वाजेपासून ते कार्यालयीन वेळेपर्यंत सर्व प्रकरणे निकाली काढणे अपेक्षित असून तद्अनुषंगाने सर्व संबंधितांना असेही सुचित करण्यात येते की, ज्या अध्यापकांना विहित केलेल्या प्रक्रियेने विद्यापीठाच्या शिबिरामध्ये उपस्थित राहून CAS योजनेअंतर्गत पदोन्नतीचा लाभ घ्यावयाचा आहे, अशा सर्व संबंधित अध्यापकांनी

नियामकामध्ये विहित केल्यानुसार प्रति अध्यापक / उमेदवाराने प्रक्रिया शुल्क रु. ३०००/- विद्यापीठाच्या लेखा विभागास दि. २५ डिसेंबर, २०२० पर्यंत भरणा करणे आवश्यक असून सदरील प्रक्रिया शुल्काचा भरणा ऑनलाईनद्वारे युनिक विभागाने उपलब्ध केलेल्या Link वर भरता येईल किंवा प्रत्यक्ष विद्यापीठ परिसर / उपपरिसराच्या लेखा विभागास शुल्क भरणा करता येईल किंवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये मा. कुलसचिव यांच्या नावे उमेदवाराने विद्यापीठास राष्ट्रीयकृत बँकेचा डी. डी. सादर केल्यास शुल्क स्विकारण्यात येईल तसेच उक्त प्रकरणी शुल्क भरणा केल्याची पावती / दस्ताऐवज शिबिरामध्ये उपस्थित असलेल्या कार्यालयीन अधिकारी / कर्मचाऱ्याकडे शिबिर आयोजित करण्यात आलेल्या दिनांकास सादर करणे अनिवार्य राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेले विषयतज्ञ, मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी (SC/ ST/DTNT / OBC / SBC/ Women/ Disabled) व शासन प्रतिनिधी यांना लेखा संहितेनुसार विहित केल्याप्रमाणे प्रवास व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील तसेच मा. कुलगुरुंचे मागास प्रवर्गाचे प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी यांना बैठक भत्ता म्हणुन प्रतिदिन / शिबिर निहाय रु. २०००/- बैठक भत्ता अदा करण्यात येईल. तद्अनुषंगाने व्यवस्थापनाने नियुक्त केलेले विषय तज्ञ, संस्था अध्यक्ष / संस्थेचे प्रतिनिधी, सचिव, प्राचार्य किंवा इतर तत्सम तज्ञ यांना प्रवास व इतर भत्ते संस्थेने अदा करणे अनिवार्य राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विहित केलेल्या Screening Committee व निवड समितीस मुलाखतीच्या वेळेस तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नियुक्त केलेल्या छाननी / तपासणी समितीमार्फत पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांचे मुल्यांकन करुन / तपासून API Score सह इतर अटी / शर्तीप्रमाणे सदरील अध्यापक पात्र आहे किंवा नाही, याबाबतचे Provisional Certificate प्रस्तावासोबत सादर करण्यात यावे परंतु तरी सुध्दा उक्त प्रकरणी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीचे मत अंतिम राहील, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी तसेच उक्त प्रकरणी CAS योजने अंतर्गत संपन्न होणाऱ्या शिबिरामध्ये पदोन्नती देण्यासाठी काही तांत्रिक कारणास्तव संबंधित अध्यापक पात्र असतांनासुध्दा पदोन्नती पासून वंचित राहू नये, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी शिबिर आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक यांना अवगत करण्यात येते की, शिबिरामध्ये भाग घेणाऱ्या अध्यापक, कर्मचारी, विषयतज्ञ, शासन प्रतिनिधी, मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी व अभ्यागत यांच्यासाठी आवश्यक आसन / बैठक व्यवस्था करुन स्थान-११, स्थान-१२, स्थान-१३A व स्थान-१४ साठी नियमामध्ये विहित केल्यानुसार Screening Committee / निवड समितीसाठी स्वतंत्र कक्षामध्ये स्थाननिहाय कक्षाचे आयोजन करुन तज्ञांच्या आसन व्यवस्थेसमोर पदनामनिहाय Name plates ठेवण्यात याव्यात, जेणेकरुन कार्यालयीन कामकाज करतांना अडचणी निर्माण होणार नाही तसेच प्रत्येक कक्षासमोर सुध्दा स्थाननिश्चिती निहाय दर्शनिय भागामध्ये Name Plates लावण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणी मा. कुलगुरुंनी नियुक्त केलेले विषयतज्ञ किंवा मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी यांना असेही अवगत करण्यात येते की, वैद्यकीय कारण व विद्यापीठ परिक्षेच्या कारणाशिवाय इतर प्रकरणी कृपया आपण उक्त प्रकरणी कार्य करण्यास असमर्थता व्यक्त करणे अनुज्ञेय राहणार नाही, ही बाब लक्षात ठेवून विद्यापीठास सहकार्य करावे, हि विनंती.

प्रस्तुत प्रकरणी सर्व विषयतज्ञांची यादी, शासन प्रतिनिधींची यादी व पदोन्नतीस पात्र असणाऱ्या अर्जदार अध्यापकांची विषय निहाय नावे विद्यापीठाने शिबिरासाठी निश्चित केलेल्या महाविद्यालयाच्या वेबसाईटवर / ई-मेल पत्त्यावर विहित मुदतीच्या आत Upload / घोषित करण्यात येईल तसेच उक्त प्रकरणी सर्व संबंधितांना काही अडचणी निर्माण झाल्यास शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व कक्ष अधिकारी यांना तात्काळ संपर्क साधण्यात यावे, हि विनंती तसेच धोरणात्मक निर्णयाविषयी काही अडचणीनिर्माण झाल्यास मा. प्र कुलगुरु महोदय यांच्याशी संपर्क साधण्यात यावे, हि विनंती.

][

**संदर्भ क्र. शैक्ष/ संलग्न/एआरडब्ल्यु/२०२०-२१/** 23745-48 ][

**दिनांक :- १९ डिसेंबर, २०२०.** =A=

**उपकुलसचिव**

**(शैक्षणिक विभाग)**

**प्रतिलिपी :-**

१) अध्यक्ष / सचिव, सर्व संलग्नीत महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२) प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देवून विनंती करण्यात येते की, सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या ई-पत्त्यावर व विद्यापीठ संकेतस्थळाच्या परिपत्रक विभागात प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती.